दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २६४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१९ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल उरण महाविकास आघाडीच्या वतीने कार्यकर्त्यांच्या भव्य मेळाव्याचे आयोजन

## आज महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा मेळावा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणाला कलाटणी देत सन्माननीय मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकारने सत्ता स्थापन केलेल्याला एव्हाना दोन वर्ष उलटून गेली.एकीकडे विरोधकांच्या कुरापतींना पुरून उरत दुसरीकडे महा विकास आघाडी सरकारने भरीव कामगिरी करून दाखविली आहे. कोरोना कालखंड, चक्री वादळे महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्ती, लसीकरण मो हीम या सगळ्या आघाड्यांवर या सरकारने उत्तम कामगिरी बजावली आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पार्टी या महाविकासआघाडी मधील घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

रविवार दिनांक १९ डिसेंबर रोजी पनवेल येथील काळण समाज हॉल मध्ये या भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सकाळी १०.३० वाजल्यापासून मेळाव्यास प्रारंभ होईल. या मेळाव्याला बाळाराम पाटील आमदार विधानपरिषद मनोहर भोईर मा. आमदार / जि. प्रमुख महेंद्रशेठ घरत कॉ. जिल्हाध्यक्ष रायगड, प्रशांत पाटील प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी, आर. सी. घरत कॉ. जिल्हाध्यक्ष पनवेल, शिरीष घरत शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख, जे. एम. म्हात्रे उदयोगपती, शेकाप नेते, सतिश पाटील जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी पनवेल, अनिल नाईक जिल्हाध्यक्ष सपा रायगड आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे मेळाव्याचे निमंत्रक, पनवेल उरण महा विकास आघाडीचे अध्यक्ष बबन दादा पाटील आणि पनवेल उरण महा विकास आघाडीचे सचिव सुदाम पाटील यांनी सांगितले.

# आता क्षणाचाही विलंब न लावता कानडी अत्याचाराची दखल घ्या

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचं पंतप्रधानांना आवाहन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज केवळ आमचेच नाहीत तर सगळ्या देशाचे दैवत आहेत. त्यांचा अवमान तर दूर, कणभर अनादरही खपवून घेणार नाही. कर्नाटकातील मराठी जनते–वरील कानडी अत्याचार थांबवून या हिणकस आणि विकृत मनोवृत्तीचा बिमोड करण्यासाठी पंतप्रधानांनी क्षणाचाही विलंब न लावता स्वतः यात लक्ष घालावे आणि तेथील राज्य शासनाला त्वरित संबंधितांवर कडक कारवाई करण्यास सांगावे, अशा तीव्र शब्दांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



बंगळुरूमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याबाबत अघटीत घडले आहे, तर त्याची कसून चौकशी करायलाच हवी. या प्रकाराकडे डोळेझाक करू नका. गेले कित्येक वर्ष कर्नाटकातील मराठी बांधवांवर अत्याचार केला जात आहे आणि आता तर शिवरायांसारख्या आपल्या आराध्य दैवताची विटंबना करण्याची घटना घडते आणि तेथील सरकार याकडे डोळेझाक करते हे दुर्दैवी आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.


नुकतेच वाराणसीत काशी विश्वेश्वराच्या मंदिरात पंतप्रधानांनी आपल्या भाषणात, दे–शाची संस्कृती चिरडण्याचा जेव्हा जेव्हा प्रयत्न झाला तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांसारखे पराक्रमी राजे निर्माण झाले असे कौतुकोद्गार काढले होते. या कार्यक्रमास काही दिवस झाले नाही तोच, भाजप शासित कर्नाटकात याच शिवरायांची विटंबना होते, आणि कुणावर कारवाई न करता उलट मराठी माणसाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होतो हे अतिशय निंदनीय आणि अवमानकारक आहे, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

राज्यात कुणाचेही सरकार असो पण दैवते बदलत नाहीत. हा कानडी अत्याचार बंद करण्यासाठी आता पंतप्रधानांनी क्षणा–चाही विलंब न लावता तातडीने तेथील राज्य सरकारला आदेश द्यावेत व या विकृत मनोवृत्तीचा बिमोड करण्यास सांगावे. बेळगावात मराठी भाषिकांच्या गळचेपी करायची. सनदशीर मार्गाने सीमाप्रश्नी लढा देत असलेल्या मराठी भाषिकांवर कन्नड कर्मठांकडून हल्ला करायचे. असे भ्याड प्रकार थांबविण्याऐवजी त्याला खतपाणी घालायचे हे चालणार नाही, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

याचबरोबर, छत्रपतींचे नाव केवळ राजकारणासाठी घ्यायचे आणि आमच्या दैवताचा अनादर झाल्यावर मात्र बोटचेपी भूमिका घ्यायची. हे कदापिही खपवून घेतले जाणार नाही. मराठी अस्मितेला डिवचणे परवडणारे नाही हे ध्यानात घ्यावे. यात केंद्र सरकारनेही दुतोंडी भूमिका सोडून ठोस पावले उचलावी, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

## संक्षिप्त...

### ओमिक्रॉनचा धोका वाढला; मुंबईत नव्या गाइडलाइन्स



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील ओमिक्रॉन बाधित रुग्णांची संख्या वाढत चालली असून आज तेलंगणमध्ये १२, महाराष्ट्रात ८, कर्नाटकात ६ तर केरळमध्ये आणखी ४ रुग्णांची भर पडली. त्यामुळे एकूण रुग्णसंख्या १४० च्यावर पोहचली आहे. दरम्यान, ओमिक्रॉनचा वाढता धोका लक्षात घेत मुंबई महापालिकेने नवीन गाइडलाइन्स जारी केल्या असून मुंबईकरांनी नाताळ आणि न्यू ईयर सेलिब्रेशन टाळावे, असे आवाहन महापालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी केले आहे.

यूरोपमधील ब्रिटन व अन्य देशांत ओमिक्रॉनमुळे कोविड रुग्णसंख्येचा उद्रेक पाहायला मिळत आहे. त्याचवेळी भारतातही करोनाच्या ओमिक्रॉन व्हेरिएंटचा धोका वाढत चालला असून आज रुग्णसंख्या १४० च्या पुढे गेली आहे. त्यात महाराष्ट्रातील आकडे चिंता वाढवणारे आहेत. महाराष्ट्रात आज ८ नवीन रुग्णांची भर पडल्याने रुग्णसंख्या ४८ झाली. आज आढळलेल्या रुग्णांपैकी ४ रुग्ण मुंबई विमानतळ सर्वेक्षणातील तर ३ रुग्ण सातारा येथील आणि १ रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रातील आहे. तेलंगणमध्ये १२ नवे रुग्ण आढळल्याने राज्यातील रुग्णसंख्या २० झाली. कर्नाटकात ६ नवे रुग्ण आढळले असून राज्यातील रुग्णसंख्या १४ झाली आहे तर केरळमध्ये ४ नवीन रुग्णांची भर पडली असून राज्यातील एकूण संख्या ११ झाली आहे.

ओमिक्रॉनचा वाढता धोका लक्षात घेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यात मुंबई महापालिकेने आज नवीन गाइडलाइन्स जारी केल्या आहेत. त्यासोबत नाताळ आणि न्यू ईयर सेलिब्रेशन टाळण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. गर्दी टाळा, गाइडलाइन्स पाळा, अन्यथा कारवाईला सामोरे जा, असा इश–ाराच पालिकेने दिला आहे. कोविड नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी प्रत्येक वॉर्डात पथक नेमण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

# मस्को कंपनीच्या ऑक्सिजन प्लान्टमध्ये स्फोट

**दै.रायगड नगरी । खोपोली**

वासरंग खोपोली येथील महिंद्रा सॅनियो स्पेशियल स्टील प्रायवेट लिमिटेड कंपनीमध्ये आज सायंकाळी ५.३. ते ६ वाजेच्या सुमारास ऑक्सीजन प्लान्टमध्ये स्फोट झाला. या स्फोटमध्ये ऑक्सीजनच्या दोन टाक्या फुटल्या. स्फोट इतका जबरदस्त होता की, वासरंग, तांबडी, सुभाषनगर येथील घरांना हादरे बसले. अनेक घरांचे सिमेंट पत्रे फुटले. टाक्या फुटल्याने वासरंग – सुभाषनगर रस्त्यांवर पांढऱ्या पावडरचा थर जमला आहे.



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार या अपघातात वाहन चालकाला दुखापत झाली आहे. मात्र दुखापतीचे स्वरूप अद्याप कळू शकलेले नाही. खोपोली पोलिस स्टेशनला माहिती मिळाल्यानंतर एक टीम घटनास्थळी दाखल झाली होती. सोबत ऍम्ब्युलन्सलाही पाचारण करण्यात आले होते. स्फोट झाला त्यावेळी शेजारील गार्डनमध्ये लहान मुले होती. तसेच स्टेडीयमवर मुले क्रिकेट खेळत होती. सुरक्षाच्या उपाययोजनांचा अभाव यावेळी प्रकर्षाने दिसून आला. या अपघातामुळे नुकसान झालेल्या नागरिकांना नुकसान भरपाई मिळणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# पोलिसांमुळे मोडले अमली पदार्थ विकणाऱ्या माफियाचे कंबरडे; आरोपी अटक

**दै.रायगड नगरी । तळा**

विक्रीसाठी गांजा बाळगणाऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्या कडून १५०० ग्राम वजनाचा गांजा एकूण १८ हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण अलिबाग पोलिस अधिकारी श्यामराव जयसिंग खराडे याबाबत यांनी फिर्याद दिली आहे.त्यानुसार तळा पोलिस निरीक्षक ओमासे यांच्या पथकाने (दि १७) रोजी २२.५० च्या सुमारास भरत भिकू तळकर यांना परीट अळी येथून अटक करण्यात आली आहे.

तळा पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार परीट अळी येथे राहणारे भरत भिकू तळकर यांनी स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी १५०० ग्राम वजनाचा अवैध्य गांजा या मादक व नशाकारी अमली पदार्थांची अवैधपणे विक्री करण्याकरिता स्वतः कडे बाळगले म्हणून त्यांचे विरुद्ध गुंगिकरक औषध द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क) २० (ब) चे उल्लंघन केले म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी भरत भिकू तळकर यांना अटक करण्यात आली आहे.

तळा तालुका अमली पदार्थमुक्त करण्यासाठी पोलिसांनी अमली पदार्थ विरोधी पथक तयार केले आहे. या पथकाने व स्थानिक पोलीस स्टेशनच्या वतीने तळा शहर आणि परिसरामध्ये अमली पदार्थांच्या अड्ड्यांवर कारवाई सुरु केली आहे. तळा शहरात काही ठिकाणी उघडपणे गांजासह इतर अमली पदार्थांची विक्री होत होती. शहरातील अडगळीत जागा मोकळ्या इमारतींमध्ये दिवसरात्र अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचे अड्डे तयार झाले होते. हे अड्डे बंद करण्यासाठी काही वर्षांपासून पोलिसांनी कंबर कसली आहे. पोलिसांनी शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृतीही करण्याची गरज आहे. अमली पदार्थमुक्त तळा करण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करणे गरजेचे आहे. अमली पदार्थांची विक्री व सेवन सुरू असल्याचे निदर्शनास आल्यास त्याविषयी पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेल महानगरपालिकेत अनुकंपा तत्वावर १६ उमेदवारांना नोकरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेमध्ये मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांचे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेसाठी एकूण २९ अर्ज प्राप्त झाले होते. शासन निर्णयानुसार संपुर्ण कागदपत्रांची छाननी करुन २९ पैकी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेल्या प्रतिक्षायादीवरील खालील एकुण १६ उमेदवारांना शैक्षणिक अर्हतेनुसार नोकरी देण्यात आलेली आहे.

यजुवेंद्र बाळकृष्ण पाटील–लिपीक टंकलेखक, निखिल राजानंद दुश्मिकर–लिपीक टंकलेखक, सायली दत्तात्रय नागरुत–लिपीक टंकलेखक, प्रतिक रमेश तळेकर–लिपीक टंकलेखक, जया राजेश बागडे–लिपीक टंकलेखक, दिपाली अविनाश म्हात्रे–लिपीक टंकलेखक, प्रितेश प्रकाश चौधरी–लिपीक टंकलेखक, प्रसाद दत्तात्रेय लोखंडे–लिपीक टंकलेखक, योगेश रामचंद्र भालेकर–शिपाई, इंद्रायणी ज्ञानेश्वर पाटील–शिपाई, गोपीनाथ सुकऱ्या सफरा–वार्डबॉय, कल्पना काळुराम पाटील–वार्डबॉय (आया), जितेंद्र नारायण घाटे–वार्डबॉय, प्रसाद गणेश दिघोडकर–वार्डबॉय, चंद्रकांत परशुराम गायकर–मजूर, प्रदिप सन्नु वाघेला–मजूर

उर्वरीत १३ अर्जदारांपैकी ५ अर्जदारांनी कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याने त्यांना कागदपत्र पुर्तता करण्याबाबत लेखी कळविण्यात आलेले आहे. तसेच ६ कर्मचाऱ्यांची शासन निर्णयानुसार वयो मर्यादा ओलांडल्याने त्यांचे अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. १ अर्जदार हे ग्रामपंचायत मध्ये ठोक मानधनावर कार्यरत होते. त्यामुळे त्यांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत लाभ अनुज्ञेय नाही. उर्वरीत १ अर्जदाराने विहीत मुदतीत अर्ज सादर न केल्यामुळे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत लाभ अनुज्ञेय नाही.

नगरपरिषद कार्यकाळापासून २००५ पासुन अनुकंपा तत्वावरील लाभ मिळणेबाबत प्रकरणे प्रलंबित होती. सदर प्रलंबित प्रकरणावर आयुक्त गणेश देशमुख यांचे निर्देश व सूचनेनुसार विठ्ठल डाके उप आयुक्त (मुख्यालय) व सुवर्णा दखणे सहायक आयुक्त यांनी व पनवेल महानगरपालिका प्रशासनातील आस्थापना विभागातील कर्मचारी नामदेव पिचड, नारायण मोरे, दिपक सिलकन, योगेश्वर पाटील यांनी अर्जदारांना लाभ मिळून देण्यासाठी विशेष परिश्रम घेवून प्रकरणाचा निपटारा केला आहे.

अनुकंपा लाभ दिलेल्या सर्वांना सोमवारी महासभेच्या वेळी मा. महापौर, मा उपमहापौर, स्थायी समिती सभापती, पक्षनेता, विरोधीपक्षनेता,यांचे उपस्थितीत आदेश वाटप होणार आहेत.

# तळोजा सीईटीपीच्या दुरुस्त तसेच विस्तारित प्रकल्पाचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र शासन अंगिकृत) तळोजा औद्योगिक श्रेत्रातील दुरुस्ती विस्तारीकरण व उन्नतीकरण केलेल्या सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा उदघाटन समारंभ सुभाष देसाई ह्यांच्या हस्ते पार पडला.

ह्यावेळी मा. म्हाडा अध्यक्ष, शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार व दि. बा. पाटील प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील, आमदार बाळाराम पाटिल, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटिल, समाजवादीचे नेते अनिल नाईक, नगरसेवक अरविंद म्हात्रे आदी उपस्थित होते. ह्यावेळी उद्योगमंत्र्याना महाविकास आघाडीच्या वतीने रामकी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या माध्यमातून होत असलेल्या प्रदुषणाबाबत निवेदनही देण्यात आले.

# माझ्या हाती सत्ता द्या १५ वर्षांचा विकासकामांचा बॅक लॉग भरून काढीन : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । तळा**

शहरातील सत्ताधारी जनतेला वेठीस धरत आहेत. त्यामुळे नगरपंचायत निवडणुकीत एकदा माझ्या हातात सत्ता देऊन बघा, तळा शहरातील १५ वर्षांचा विकासकामांचा बॅक लॉग भरून काढीन असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस खा.सुनील तटकरे यांनी तळा नगरपंचायत निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या जाहीर प्रचार सभेत व्यक्त केला. या प्रचार सभेसाठी खा.सुनील तटकरे, आ.अनिकेत तटकरे, महिला बाल कल्याण सभापती गीता जाधव, राजीप सदस्य बबन चाचले,सभापती अक्षरा कदम उपसभापती गणेश वाघमारे, तालुका अध्यक्ष नाना भौड, शहर अध्यक्ष महेंद्र दळवी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व उमेदवार कार्यकर्ते आणि तळेवसी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



तटकरे पुढे म्हणाले की आज ग्रामीण भागात असा कुठलाही गाव नाही वाडी नाही जीथे रस्त्यांचे जाळे विणलेले नाही. मी जिल्हा परिषद अध्यक्ष असताना तळा शहरासाठी अंबेली येथून पहिली पाणी योजना मंजूर करून आणली शहराचा विकास करायला अक्कल लागते ती अक्कल आणि नियोजन सत्ताधारी शिवसेनेकडे नाही.आज ज्यांना शहर माहीत नाही ते प्रचार करण्यासाठी आले होते

.../२

# इंडस्ट्रीज उभारून स्थानिकांना रोजगाराच्या संधी देणार : ना.सुभाष देसाई

## थापा मारणाऱ्यांना थारा देऊ नका तटकरे यांचे नाव न घेता टीका

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत निवडणूक जाहीर प्रचार सभेचे शिवसेनेकडून आयोजन (दि १७) रोजी गणेश मंगल कार्यालयात करण्यात आले होते यावेळी शहरातील मतदारांना संबोधित करताना राज्याचे उद्योग मंत्री ना.सुभाष देसाई यांनी तळा तालुक्यातील मुळ समस्येला हात घालून स्थानिकांना रोजगार देण्याच्या संदर्भात भाष्य केले व जनतेला अभिप्रेत असलेला विकास शिवसेनेकडून केला जाईल असे सांगितले.शब्द देताना विचार करून द्यावा आणि दिलेला शब्द आम्ही पाळणारे आहोत असे त्यांनी सांगितले यासाठी युवकांना बाळासाहेब ठाकरे रोजगार प्रशिक्षण केंद्र उभारून त्याची सुरवात करण्यात येईल. त्याच बरोबर विकास कौशल्य केंद्राची निर्मिती करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्य सरकारने या भागात अनेक जमिनी संपादित केल्या आहेत इंदापूर जवळ ५००० एकर जमीनीवर विविध प्रकारच्या वस्त्रोद्योग, फर्निचर उद्योग, इंडस्ट्रीज उभारून रोजगार



.../२

# जुनी स्वप्ने, नवा भंग

राजकीय पक्ष आणि राजकीय नेत्यांनी सत्ता हेच पहिले आणि अंतिम ध्येय, पैसा हेच पहिले आणि अंतिम सत्य ही विचारसरणी स्वीकारल्यापासून जी घसरण सुरू झाली, ती गेल्या काही वर्षांत तीव्र उतारावर आली असून या घसरणीचा वेग कमालीचा वाढला आहे. लोकशाहीचा जप करायचा आणि विविध प्रकारच्या संरजामशाहीचे मणी ओढत केवळ सत्ताप्राप्तीचेच राजकारण करायचे, ही रीत सर्वच पक्षांनी स्वीकारली आहे; त्यामुळे विधीमंडळे ही लोकांचे प्रश्न धसास लावण्यासाठीची जागा आहे याचा विसर सर्वांनाच पडला असून, तो केवळ सत्तासंघर्षाचा आखाडा बनला आहे. प्रजा फाउंडेशनने आमदारांच्या कामगिरीचा आढावा घेणारा जो अहवाल प्रसिद्ध केला आहे, त्याच्या निष्कर्षातून आपल्या लोकशाही व्यवस्थेतील या महत्त्वाच्या घटकाचे होत असलेले अवमूल्यन ठळकपणे समोर आले आहे. सत्ता स्थापनेच्या काळात होत असलेल्या बेरजा, वजाबाक्या, गुणाकार आणि भागाकार हे सगळे सत्ता स्थापनेनंतर संपुष्टात येऊन, पुढील संघर्ष सभागृहात होत असे. आता मात्र हा संघर्ष सभागृहाबाहेरच होत असून, त्याने अतिशय खालची पातळी गाठली आहे. जनतेच्या प्रश्नासाठी लढण्याचा राजकीय नेत्यांना साफ विसर पडला आहे. केवळ स्वतःचे अस्तित्व राखणे, ताकद वाढवणे आणि प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करणे यातच त्यांची ताकद, वेळ आणि बुद्धी खर्ची पडू लागली आहे. पक्षांतराची वृत्ती काही आजची नाही; परंतु एके काळी अशा वैचारीक परिवर्तनाची नेत्यांना 'मनाची' किंवा 'जनाची' थोडीफार वाटत असे, आता तीही वाटेनासी झाली आहे. जॉर्ज ऑर्वेलने त्याच्या '१९८४' या कादंबरीत राजकीय निष्ठांविषयी लिहिलेले, 'डबलथिंक मिन्स द पॉवर ऑफ होल्डिंग टू काँट्राडिक्टरी बिलिफ्स इन वन्स माइंड सायमल्टेनिअसली अँड अॅक्सेप्टिंग बोथ ऑफ देम' हे वाक्य अक्षरशः खरे ठरू लागले आहे. आरोप, शत्रुत्व, मतभेद असे सगळे काही पक्षांतराच्या धुलाई मशीनमधून स्वच्छ होत असल्याने, कुणाला काही प्रश्नच पडत नाहीत. प्रजा फाउंडेशनच्या अहवालानुसार विधानसभेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या संख्येत ७४ टक्के घट झाली आहे. करोनाच्या काळात वारंवार आरोग्य आणि शिक्षणविषयक समस्यांची चर्चा प्रसारमाध्यमांनी केली, तज्ज्ञांनीही त्याविषयी चिंता व्यक्त केली होती. आपल्या लोकप्रतिनिधींना याची कल्पना नसावी; कारण आरोग्यविषयक प्रश्नांमध्ये ६२ टक्के, तर शिक्षणविषयक प्रश्नांमध्ये तब्बल ७२ टक्क्यांची घट झाल्याचे दिसून आले आहे. शिक्षणविषयक नियमांचा, निर्णयांचा आणि परीक्षांचा जो घोळ गेल्या काही दिवसांत घातला गेला, तो या वृत्तीशी सुसंगतच म्हटला पाहिजे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात तर त्याही पुढची मजल गाठली गेली आहे. भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांच्या प्रतिनिधींनी एकही प्रश्न विचारला नाही, असे हा अहवाल सांगतो. 'प्रश्न पडलेच नाहीत, तर ते विचारणार कसे,' अशी बहुधा स्थिती असून; त्यामुळेच २००९मध्ये, सरकार स्थापनेच्या पहिल्या वर्षात सभासदांनी विधीमंडळात विचारलेल्या ७९५५ प्रश्नांच्या तुलनेत, २०२०मध्ये केवळ २०५६ प्रश्न विचारले गेले. सभागृहात कामकाज न होणे, अधिवेशनाचा कालावधी कमी करणे, एखाद्या विषयावरून गोंधळ घालत कामकाज बंद पाडणे ही वृत्ती वाढत आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोघेही त्यास जबाबदार आहेत. कामकाज झाले नाही, तर विरेधकांच्या प्रश्नांच्या फैरींना उत्तर देण्याची वेळच येत नाही, विषय़ाचा अभ्यास करावा लागत नाही; त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या ते पथ्यावरच पडते. क्रियाशील सदस्य म्हणजे गोंधळ घालणारा, सतत माध्यमांसमोर येणारा, अद्वातद्वा बोलणारा अशी नवी व्याख्या तयार झाल्याने, सदस्य सभागृहात बोलण्यापेक्षा बाहेरच्या कामगिरीवर अधिक लक्ष देऊ लागले आहेत. विशेष म्हणजे, आपण निवडणूक जाहीरनाम्यात जे प्रश्न मांडले होते, त्यासंदर्भात सत्ताधारी पक्षाला धारेवर धरण्यातही लोकप्रतिधींना स्वारस्य नसल्याचे दिसून आल्याचे हा अहवाल सांगतो. महाराष्ट्रात सध्या असलेले महाआघाडीचे सरकार स्थापन होताना व त्या आधी अभूतपूर्व नाट्य घडले होते. त्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी सत्ता टिकवून ठेवण्यासाठीच सगळी शक्ती खर्च करताना दिसत आहेत, तर विरोधक अजूनही आपली गेलेली सत्ता पुन्हा कशी मिळवता येईल, याच्या स्वप्नरंजनात आहेत. त्यातून एकमेकांची प्रकरणे बाहेर काढण्याची स्पर्धा सुरू झाल्याने, सामान्य माणसाचा दुतर्फी भ्रमनिरास होतो आहे. सभागृहातील वैचारिक वाद, तात्त्विक लढाया, एखाद्या प्रश्नांवर तासन् तास घडणाऱ्या चर्चा हा बहुधा आता इतिहासच म्हणावा लागेल. कायदे करणे आणि ते रद्द करणे या दोन्हीसाठी जेव्हा चर्चेची गरज भासत नाही, तेव्हा हे असेच होत राहणार. सामान्य माणूस प्रत्येक निवडणुकीनंतर 'जुनी स्वप्ने, नवा भंग' हे विंदांचे शब्द उच्चारत आवंढे गिळत राहणार.

# दलालीच्या विळख्याने माथेरानची प्रतिमा होतेय मलिन ; अल्पवयीन लोकांनाही रूम्स मिळण्यास करतात मदत

**दै.रायगड नगरी । माथेरान**




महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांचे मुंबई पुणे सारख्या मोठ्या शहरांच्या अगदी शेजारीच असलेले हिल रेल्वे चे एकमेव ठिकाण असलेले माथेरान हल्ली तरुणाईचे आवडते पर्यटन होत आहे त्यामुळे येथे तरुणाईची नेहमीच लगबग दिसून येत असते अनेक जण सकाळी येऊन संध्याकाळी पुन्हा परत जात असतात त्यामध्ये अविवाहित जोडप्याचा अधिक भरणा असतो अशा लोकांना रूम्स उपलब्ध करून देण्यासाठी येथील प्रवेशद्वार दस्तुरी नाका येथे दलाली करणाऱ्या लोकांमध्ये चढाओढ पहावयास मिळत असते त्यातील अनेक जण हे येथील रहिवासीही नाहीत पण अवैध धंदा करणाऱ्या काही लोकांना हाताशी धरून हा धंदा मागील काही दिवसांमध्ये तेजीत सुरू आहे ह्याचेच फलित मागील दिवसांमध्ये पहावयास मिळाले होते त्यामुळे अशा लोकांना आवरण्याची वेळ झाली असून पोलीस प्रशासनाने ह्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

माथेरान हे मध्यमवर्गीय लोकांचे पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे पूर्वी येथे पारसी, कॅथलिक व इतर धर्मीय लोक फक्त आराम करण्यासाठी येत असत पण मागील काही वर्षांमध्ये येथे ह्या लोकांची संख्या कमी झाली पंधरा दिवस राहणारी ही पिढी जरी गायब झाली तरी येथील पर्यटनाला भरभराट येत होती त्या ऐवजी एक ते दोन दिवस राहण्यासाठी इतर मध्यमवर्गीय लोकांची संख्या वाढू लागली त्यामुळेच कदाचित बाबा लोकांनी माथेरानकडे पाठ फिरवली पण माथेरानचे पर्यटन दोन दिवसांवर येऊन ठेपल्यावर स्थानिक लॉजिंग व्यवसायामध्ये वाढ होऊ लागली स्थानिक लॉजिंग मध्ये रूम भरणार्यासाठी स्वखुशीने बक्षीस देण्याची प्रथाही ह्याच दरम्यान सुरू झाली पण हीच प्रथा आता माथेरानच्या पर्यटनाच्य मुळावर घाव घालत असून हमालिकरून बक्षीस मिळवणारे आता दलाली चा धंदा करू लागले असून बक्षिसांची जागा आता दलालीने घेतली आहे काहीजण तर दलाल मागेल तेवढे पैसे त्यांना आपले रूम्स भरण्यासाठी देत आहेत त्यामुळे येथील पर्यटन व्यवसाय बदनाम होऊ लागला आहे ह्या दलालांना माथेरानच्या पर्यटनाशी काहीही देणेघेणे नसून फक्त आपल्याला मिळणाऱ्या दलालीसाठी कोणत्याही हॉटेल वा लॉजिंग व्यवसायिकास बदनाम करण्यास मागेपुढे पाहत नाहीत.

ह्या दलालीच्या व्यवसायाची पाळेमुळे खोल रुजत चालली असून त्याची सुरवात नेरळ रेल्वे स्थानकापासून सुरू होते येथूनच येताना पर्यटकांना येथील दलाली चा पहिला अनुभव येतो येथूनच पर्यटकांना विविध फोटो दाखवून अधिक किमतींमध्ये रूम्स घेण्यास भाग पाडले जाते व ह्यावेळी दिली गेलेली माहिती अनेक वेळा खोटी असल्याचे पर्यटकांच्या निदर्शनास येते तर तेथून पुढे आल्यावर माथेरानच्या प्रवेशद्वारावर दलाल, हमाली करणारे दलाल, अश्वचालक दलाल अशा विविध दलालांच्या जातीमधून पर्यटनस्थळांची वाट शोधावी लागते त्यामधून निघता निघता पर्यटकांची पुरती दमछाक होत असते.

मागील काहिवर्षांमध्ये अल्पवयीन व संशयास्पद येणाऱ्या जोडयाना ह्या लोकांनी निशाण्यावर घेतल्याने अशा लोकांची वर्दळ माथेरानमध्ये वाढली आहे दलालांच्या ह्या विलख्यामुळे काहीजणांना जरी फायदा होत असला तरी माथेरानच्या पर्यटनाचे मात्र नुकसान होत आहे नुकतीच येथे घडलेली खुनाची घटना व ह्यापुर्वीही अशा प्रकारचे गुन्हे येथे दलालीमुळे घडलेले आहेत

आताही माथेरानमध्ये पर्यटकांना भुलविण्याचा एक नवीन प्रकार आलेला असून काही पर राज्यातील मंडळी हॉलिडे पॅकेज च्या नावाखाली भर रस्त्यात पर्यटकांना रोखून नवनवीन आमिषे दाखवून स्कीम घेण्यासाठी भाग पाडत आहेत मागील दोन तीन वर्षांमध्ये ही मंडळी नावे बदलून वेगवेगळ्या हॉलिडे स्कीम च्या नावाखाली पर्यटकांना भुलवत आहेत असे प्रकार माथेरानच्या पर्यटनाच्या दृष्टीने घातक असून माथेरानचे स्थानिक प्रशासन व पोलीस प्रशासनाने ह्याकडे वेळीच लक्ष देऊन हा दलालीच्या विळख्यातून माथेरानच्या पर्यटनाला सोडवावे अशी मागणी येथील स्थानिक करीत आहेत.

# गोवंश चोरीची घटना अखेर म्हसळा पोलिसांनी तक्रार नोंदविली

## दक्षिण रायगडात गोवंशाची तस्करी करणारी टोळी सक्रीय

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळे तालुक्यांत सक्रीय असावी अशी शेतकरी वर्गात चर्चा सुरु असतानाच म्हसळा शहरा नजीकच्या सावर गावा तील एका शेतकऱ्याचा बैल चोरीच्या घटनेने पुढे आला. चरायला सोडलेला बैल रात्री ठरल्या वेळी घरी न आल्याने सावर येथील सदा काते या भांबावलेल्या शेतकऱ्याने पोलीसांकडे धाव घेतली हकीगत ऐकली पण पोलीसानी चोरीची नोंद न केल्याने अखेर शेतकऱ्यानी शहर व तालुका हिंदू समाजाचे अध्यक्षांकडे आपले गाऱ्हाणे मांडले त्यात शेतकऱ्याने पोलीसाना घटनाक्रम सांगूनही पो-लीसानी नोंद केली नाही असे सांगताच हिंदू समाजाचे अध्यक्ष महादेव पाटील, शहर हिंदू समाजाचे अध्यक्ष सुभाष उर्फ बाळशेट करडे,बजरंग दलाचे बाबू बनकर व अन्य पदाधिकारी व शेतकरी यानी प्रभारी आधीकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन बैलचोरीच्या घटनेची प्रथम नोंद करावी असा अग्रह धरला.

घटना व साक्षीदार यांची पडताळणी व गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून या गुन्ह्यामागे गोवंशाची तस्करी करणारी टोळी असणार याकारणाने अखेर पोलीसानी गुन्हा नोंदविला.सावर(म्हसळा)येथील शेतकरी सदानंद गोविंद काते वय ४८ यांनी दिलेल्या फिर्यादी वरून गु.र.नं.७८ भा.दं. सं ३७९, ५११, ३४प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली. गुन्हा नोंदविल्यापासून केवळ ८ ते १० तासात आरोपीला अटक केले असल्याचे तपासी अमलदार हे कॉ. चव्हाण यानी सांगितले. फिर्यादी अगर तक्रारदाराने याबाबत सर्वकष माहीती देऊनही म्हसळा पोलीस अनेक वेळा गुन्हा रितसर नोंदविण्यास विलंब करतात याची वरीष्ठानी चौकशी करणे आवश्यक आहे असे पाटील यानी यावेळी सांगितले.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## माझ्या हाती सत्ता द्या १५ वर्षांचा विकासकामांचा बॅक लॉग भरून काढीन

अशी टीका उद्योग मंत्री ना.सुभाष देसाई यांचे नाव न घेता तटकरे यांनी केली. ९ कोटी पाणी योजना मंजूर करण्यासाठी मी अडथळा आणला असा आरोप ज्यांनी केला त्यांनी जलसंपदा खात्याकडून नाहरकत दाखला कोणी आणला याची चौकशी करावी मी जलसंपदा खात्याचा ४ वर्षे मंत्री होतो त्यामुळे ते शक्य झालं. पालकमंत्री अदिती तटकरे यांनी पाठपुरावा केला आणि राज्याचे उपमुख्य मंत्री आणि अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी या योजनेस मंजुरी दिली असल्याचे त्यांनी सांगितले. आज तत्वतः मान्यता मंजूर करून आणल्यानंतर ती पाणी योजना सत्ताधाऱ्यांनी एक वर्षात का पूर्ण केली नाही श्रीवर्धन नगर पालिकेमध्ये २२ कोटीची पाणी योजना मंजूर करून तिचे काम देखील सुरू करण्यात आले आहे काम करण्याची मानसिकता आणि ताकद मनगटात लागते.

नगरपंचायतीत सत्ताधारी यांच्यात पराकोटीची भांडण आहेत येथे केवळ ठेकेदारी मधून मलिदा खाण्याचे काम सुरू आहे. १२ वाड्यांमध्ये वसलेले हे शहर या शहराचा विकासाचा आराखडा करण्यासाठी दादासाहेब देशमुख असतील अशोक लोखंडे असतील यांनी आपले योगदान दिले त्यासाठी विकासाचा चेहरा लागतो यांच्याकडे कोणता चेहरा आहे? चंद्रकांत रोडे यांनी सभापती म्हणून काम केले आहे प्रशासकीय अनुभव दांडगा आहे त्यामुळे ते नगरपंचायतीत आमचा विकासाचा चेहरा असतील असे सुनील तटकरे यांनी जाहीर केले माझ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार यांच्या मागे सुनील तटकरे ठामपणे उभा आहे मागच्या वेळी आम्ही कमी पडलो आमची चुकी झाली मी मतदारांची चुकी म्हणणार नाही पण यावेळी फक्त एकदा संधी द्या रोहा माणगाव म्हसळा श्रीवर्धन शहराच्या धर्तीवर तळा शहराचा विकास करण्यात येइल राज्यात १०५ नगरपंचायतीच्या निवडणुका लागल्या आहेत या १०५ नगरपंचायतीमध्ये विकासकामांच्या बाबतीत तळा नगरपंचायत पहिल्या पाच नगरपंचायतीमध्ये असेल असे वचन त्यांनी यावेळी दिले सुनील तटकरे जे वचन देतो ते पाळतो म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व उमेदवारांना घड्याळाच्या चिन्हा समोरील बटण दाबून विजयी करा अशी कळकळीची विनंती त्यांनी यावेळी केली.

चंद्रकांत रोडे यांनी सत्ताधारी शिवसेनेवर टीकेची झोड उठवत शिवसेनेच्या नाकर्तेपणामुळे तळा शहराची वाट लागली असल्याचे सांगितले.स्थानिक पुढारी केवळ ठेकेदारीतून मलिदा कसा मिळत असेल यावर लक्ष ठेऊन आहेत. पाण्याची गंभीर नियोजन असल्याने शहर सोडून लोक दुसऱ्या शहरात स्थलांतरित झाली आहेत तळा शहराचा विकास करायचा असेल तर राष्ट्रवादी काँग्रेसला संधी असे आवाहन त्यांनी सर्व मतदारांना केले.शहर प्रमुख महेंद्र कजबजे यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले.

## इंडस्ट्रीज उभारून स्थानिकांना रोजगाराच्या संधी देणार : ना.सुभाष देसाई

निर्माण केले जाणार असल्याचे सूतोवाच त्यांनी केले यासाठी राज्याचे लाडके मुख्यमंत्री शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या केवळ जमिनी संपादित करून चालणार नाही त्यांना रोजगार देण्याच्या दृष्टीने पाऊले उचलावीत असे आदेश दिल्या नंतर नुकताच दुबइ येथे माझा एक दौरा झाला. या दौऱ्यात अनेक कंपन्यां बरोबर राज्य शासनाने सामंजस्य करार करण्यात आले असून लवकरच याठिकाणी मोठे उद्योगधंदे उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तळा नगरपांच्यतीमध्ये भगवा झेंडा फडकणार आहे यात शंका नसून तो यावेळेस जास्त डौलाने फडकणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला केवळ थापा मारणाऱ्यांना थारा देऊ नका असा टोला त्यांनी तटकरे यांचे नाव न घेता दिला निवडणुका आल्या की काही लोक विकासकामांची पत्र देतात कामे काही करत नाहीत त्या पत्राला फ्रेम घालून भिंतीवर लटकून हार घालयचा का? अशी ही टीका त्यांनी तटकरे यांचे नाव न घेता केली तळा नगरपंचायतीमध्ये शिवसेनेने केलेल्या कामाची वचनपूर्ती म्हणून एक जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे.या जाहीरनाम्यात करोडो रुपयांची कामे केली गेली आहेत आणि येणाऱ्या काळात उरलेली विकासकामे करण्यात येतील त्याची जबाबदारी मी घेतो असे आश्वासन त्यांनी दिले ९.५० कोटी रुपयांची पाणी योजना मंजूर करण्यात आली आहे. पाणीपुरवठा मंत्री, नगरविकास खत्याचे मंत्री शिवसेनेचे असून ही सर्व कामे मंजूर करून घेण्याची जबाबदारी माझी आहे.शिवसेनेच्या नगरसेवकांनी जनतेची कामे करावीत असा सल्ला त्यांनी दिला. शिवसेना आणी मतदार यांची चांगली घट्ट पकड बसली असून नगर पंचायत शिवसेनेच्या ताब्यात देण्यासाठी जनताच सज्ज झाली आहे यावेळी देखील बहूमताने नगरपंचायतीचा भगवा फडकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा प्रमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर टीकेची झोड उठवत पाच वर्षे विकासकामे न करता शिवसेनेने मंजूर करून आणलेल्या विकासकामांना अडथळा निर्माण करण्याचे काम पालकमंत्री यांनी केले म्हणून आज तळा शहरात खासदार, पालकमंत्री,आमदार यांना घरोघरी फिरावे लागत आहे याउलट शिवसेनेच्या नगरसेवकांनी सर्वच प्रभागात विकासकामे मंजूर करून आणली असल्याचा दावा त्यांनी केला तळा शहराचा अजून बराच विकास करायचा असून शिवसेनेच्या उमेदवारांना धनुष्यबाण या निशाणी समोरील बटण दाबून बहुमताने विजयी करा असे आवाहन त्यांनी केले यावेळी माजी आ.अवधूत तटकरे, तालुका प्रमुख प्रदूम्न ठसाळ यांनी देखील मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, माजी आमदार अवधूत तटकरे, तालुका प्रमुख प्रदूम्न ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके.डॉ. संतोष कामेरकर माजी जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर अॅड.चेतन चव्हाण, उप तालुका प्रमुख शरद सारगे, नमित पांढरकामे, ,लिलाधर खातू, अमेय लोखंडे उपनगराध्यक्षा सायली खातू उप सरपंच नाना दळवी महीला संघटक नम्रता पाडळकर शिवसैनिक आणि तळेवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल परिसरात दत्तजयंती उत्साहात साजरी

दै.रायगड नगरी । पनवेल



पनवेल शहर परिसरात दत्तजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील श्री स्वामी समर्थ मठ मंदिर, नवनाथ मंदिर, दादा वाघिलकर यांचे दत्त मंदिर, पनवेल तालुका पोलीस ठाणे येथील दत्त मंदिर, कळंबोली पोलीस ठाणे येथील दत्त मंदिर, तळोजा पोलीस ठाणे, वाहतूक शाखा आदींसह विविध ठिकाणी दत्त मंदिरामध्ये यंदाही सालाबादप्रमाणे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाद्वारे भक्त मंडळींनी दत्त जयंती साजरी केली. या निमित्ताने खिडूकपाडा येथे शेकाप महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास (अण्णा) अर्जुन भोईर यांनी यावर्षी साई समर्थ हॉस्पिटल (कामोठे), डॉ.रुपेश वडगावकर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबीर व रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. याला सुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अशाच प्रकारे विविध ठिकाणी दत्त जयंती उत्साहात व भक्तीभावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

# कोकण एज्युकेशन सोसायटीचा १०४ वा वर्धापन दिन व्हि.के.हायस्कूलच्या प्रांगणात उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**



कोकण एज्युकेशन सोसायटीचा १०४ वा वर्धापन दिन व्हि.के.हायस्कूलच्या प्रांगणात उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी शाळा समिती सभापती व शिक्षक आमदार बाळाराम पाटील साहेब यांनी ध्वजारोहण केले. यावेळी विरोधी पक्षनेते व शालेय समितीचे सदस्य प्रीतम म्हात्रे, इंदूबाई वाजेकर इंग्रजी माध्यमाचे सभापती व्ही. सी.म्हात्रे , वि.के .विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व संकुल प्रमुख पी.बी ठाकूर संकुलातील सर्व मुख्याध्यापक पर्यवेक्षक शिक्षक शिक्षकेतर बंधू-भगिनी उपस्थित होते.

२५ मे १९१८ रोजी कुलाबा स्टुडेंट असेसिएशन या रोपट्याचे रुपांतर कोकण एज्युकेशन सोसायटी या ग्रुपच्या झाले १५ ऑगस्ट १९१८ रोजी संस्थेचे पहिले संचालक मंडळ अस्तित्वात आले. विद्यार्थी जर शाळेपर्यंत येऊ शकत नसतील तर शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली पाहिजे हा महात्मा ज्योतिबा फुले यांचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणला तो को.ए.सो. चे माजी अध्यक्ष माननीय लोकनेते ऑड. दत्ता पाटील यांनी, प्रभाकर पाटील यांच्या सोबतीने गावोगावी शाळा सुरू केल्या खेडोपाडी गोरगरिबांना शिक्षण सहज उपलब्ध करून दिले. आज को.ए. सो. चे विद्यार्थी देशात विदेशात सन्मानाच्या पदावर कार्यरत आहेत.

१८ डिसेंबर १९२४ रोजी संस्थेने थोर शिक्षणकार डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या शुभहस्ते आपला रौप्य महोत्सव साजरा केला त्याची आठवण म्हणून आजही १८ डिसेंबर हा दिवस संस्थेचा वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. रायगड जिल्ह्यातील खंबीर क्रांतिकारी नेतृत्व व जहाल व्यक्तिमत्व असलेल्या दत्ता पाटील यांनी १९७०साली कार्याध्यक्ष पद स्वीकारले त्यानंतर संस्थेच्या जवळजवळ सर्व शाळा ग्रामीण परिसरात देखील सुरू झाल्या.

संस्थेचा शाखा विस्तार थोडक्यात पाच महाविद्यालय ४० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तीन विनाअनुदानित माध्यमिक शाळा १० मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा सात इंग्रजी माध्यमाच्या शाळा सात इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाला पाच व्यवसाय अभ्यासक्रम विभाग असलेल्या शाळा अशा एकूण ७० रायगड सिंधुदुर्ग व ठाणे या जिल्ह्यात विशेषत खेड्यात विखुरलेल्या आहेत. ज्ञानदानाचे उत्तम काम करत आहेत. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष संजयभाई पाटील उत्तमरीत्या सांभाळत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

### जासई हायस्कूल मध्ये अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा



**दै.रायगड नगरी । उरण**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज, जासई या विद्यालयात १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात आला.या कार्य क्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,भारतीय मजदुर संघाचे राष्ट्रीय महामंत्री श्री सुरेश पाटील हे होते.

त्यांनी अल्प संख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती,भाषा,धर्म आणि परंपरा यांचे संवर्धन करता यावे म्हणून राज्य घटनेने जे अधिकार दिले आहेत त्यांची माहिती आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शन पर भाषणात विद्यार्थ्यांना दिली. या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर श्री अरुण घाग सर यांनीही आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणीव करून दिली. तसेच रयत सेवक संघाचे समन्वयक श्री शेख एन एच. व सौ.नेहा हुदार मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री साळुंखे आर. एस. व सर्व सेवक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. तसेच यशवंत घरत, सुभाष घरत, बाळाशेठ पाटील इत्यादी शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते. या अल्पसंख्यांक हक्क दिवसा निमित्ताने विद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते.तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे कार्यक्रमाचे मा.अध्यक्ष श्री सुरेश पाटील यांच्या हस्ते अभिनंदन केले गेले.

# नगराध्यक्षांचा पाठपुरावा ; वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी ५ कोटी रु. निधी माथेरान नगरपरिषदेसाठी मंजूर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आशीर्वादाने तसेच पर्यटन आणि पर्यावरण मंत्री तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान या पर्यटन क्षेत्रात अभूतपूर्व अशी विविध पर्यावरण पूरक विकास कामे सुरू असून विविध विकास कामे अंतिम टप्प्यात आहेत तर विविध नवनवीन विकासकामे प्रस्तावित आहेत.

त्याच अनुषंगाने माथेरान मधील वैशिष्ट्यपूर्ण विकासकामांसाठी महाराष्ट्र राज्याचे नगरविकास मंत्री ना.एकनाथ शिंदे यांचे मार्फत व मावळचे खासदार श्रीरंग (आप्पा) बारणे यांच्या विशेष शिफारसीने तसेच माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांच्या विशेष प्रयत्नातून वैशिष्टयपूर्ण कामांसाठी ५ कोटी रु. निधी माथेरान नगरपरिषदेसाठी मंजूर करण्यात आला आहे.हा पाच कोटी रुपयांचा निधी महत्त्वपूर्ण



कामासाठी खर्च करण्यात येणार आहे.२०१६ रोजीच्या निवडणूक काळात नागरिकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी शिवसेनेने कंबर कसली असून नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि गटनेते प्रसाद सावंत यांच्या देखरेखीखाली आगामी काळात ही सर्व महत्वकांक्षी कामे प्रगतीपथावर पूर्णत्वास जाणार आहेत. पाच कोटी रुपयांमधून दोन कोटी रुपये माथेरान हद्दीतील मॅलेट स्प्रिंग मिनरल वॉटर प्रकल्प करणे.

याकरिता खर्च करण्यात येणार असून या मॅलेट स्प्रिंग मधील नैसर्गिकरित्या वाहणाऱ्या पाण्याचा सदुपयोग हा उत्तम प्रकारे होणार आहे येथूनच पाण्याच्या प्लास्टिक बाटल्या भरून त्याची विक्री नगरपरिषदेच्या माध्यमातून केली जाणार आहे त्यामुळे साहजिकच नगरपरिषदेच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होऊ शकते.

एक कोटी रुपये माथेरान हद्दीतील हिंदू स्मशानभूमी विकसित आणि अद्ययावत करणे यासाठी खर्च करण्यात येणार आहे यामध्ये या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार वेळेस डिझेल दाहीनीत मृताचे कार्य केले जाते त्यासाठी अद्ययावत जनरेटर सोय केली जाणार आहे त्याचप्रमाणे येथील प्रवेशद्वार, बसण्यासाठी बाकडे, लाईट, गार्डन बनविण्यासाठी नगरपरिषदेचा मानस आहे. माथेरान हद्दीतील सामाजिक सभागृह/समाज मंदिर विकसित करणे.यासाठी एक कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. माथेरान नगरपरिषदेचे कार्यालय खूपच जुने असून त्याठिकाणी जागा अपुरी पडते याकामी कम्युनिटी सेंटर या गावाच्या मध्यवर्ती भागात नगरपरिषदेचे कार्यालय खुले केल्यास तिथे नगराध्यक्ष केबिन तसेच अन्य लोकप्रतिनिधी,कर्मचारी यांना स्वतंत्र ऑफिस बनविण्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे.माथेरानचे एक पाऊल नव्या बदलाकडे,नव्या क्षितिजाकडे झेप घेताना प्रगत होताना विकसनशील क्षेत्र बनत आहे

त्यासाठी शिवसेना शहर संपर्क प्रमुख नगरपरिषदेचे गटनेते , बांधकाम सभापती प्रसाद विश्वनाथ सावंत यांनी तमाम शिवसैनिक आणि समस्त माथेरानकरांच्या वतीने महाविकास आघाडी सरकारचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## पनवेल परिसरात सापडले अल्पवयीन मुलीचे अर्भक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका अल्पवयीन मुलीचे अर्भक पनवेल परिसरात सापडल्याने एकच खळबळ उडाली असून सदर मुलीच्या आई वडिलांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

नांदगाव परिसरातील एका झाडीमध्ये एका नवजात बालकीचे अर्भक सापडले आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस परिसरात कसून चौकशी करीत आहेत.

या संदर्भात पनवेल शहर पोलिसांनी सदर अज्ञात आई वडिलांविरोधात गुन्हा नोंद केला आहे. तसेच या संदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन सुद्धा करण्यात आले आहे.

## जासई हायस्कूलमध्ये अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील प्रसिद्ध रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज, जासई या विद्यालयात १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात आला.या कार्य क्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदुर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील हे होते.त्यांनी अल्प संख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म आणि परंपरा यांचे संवर्धन करता यावे म्हणून राज्य घटनेने जे अधिकार दिले आहेत त्यांची माहिती आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शन पर भाषणात विद्यार्थ्यांना दिली.

## विकासकामांची पुर्तता करण्यासाठी पुन्हा संधी द्या : आ.गोगावले

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

कोट्यवधी रुपयांची विकासकामे पोलादपूर शहरात केली आहेत आणि उर्वरित प्रस्तावित कामे करण्यासाठी राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यामाध्यमातून तीन कोटी रुपयांची मंजुरी आणलेली असून या विकासकामांच्या पूर्ततेसाठी पुन्हा नगरपंचायतीमध्ये शिवसेनेला संधी द्या, असे आवाहन करीत आ.भरत गोगावले शिवसेनेच्या कार्यकर्त्यासमवेत सर्व सोळा उमेदवारांच्या प्रभागांतील मतदारांच्या दारापर्यंत पोहोचले.

या प्रचार फेरीत जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे तालुका प्रमुख निलेश अहिरे शहरप्रमुख अण्णा गायकवाड माजी



शहर प्रमुख सुरेश पवार विभाग प्रमुख लक्ष्मण मोरे आणि शहरातील शिवसैनिक युवासैनिक महिला भगिनी आणि उमेदवार इत्यादी उपस्थित होते.

याप्रसंगी प्रभाग १७ चे उमेदवार सुरेश पवार प्रभाग १३ मध्ये सिध्देश शेठ, प्रभाग १५ मध्ये विनायक दिक्षित, प्रभाग १ मध्ये सुनीता पार्टे आणि प्रभाग ६ साठी अस्मिता पवार, प्रभाग १२ मध्ये मृगया शहा, प्रभाग ३ साठी रोहित सावंत, प्रभाग ५ साठी शिल्पा दरेकर, प्रभाग ७ साठी सुषमा पवार इत्यादी उमेदवारांच्या प्रचारासाठी शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोरदार रॅली काढल्या.

## मजगांवमध्ये दत्तजयंतीवर कोरोना ओमायक्रानचे सावट

### एकशे पंचावन्न वर्षांची पारंपरिक भिक्षा फेरी साधेपणाने

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील मजगांव मध्ये एकशे पंचावन्न वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात येणा-या दत्तजयंती उत्सवावर कोरोना ओमायक्रानचे सावट असून सकाळची भिक्षाफेरी अत्यंत साधेपणाने काढण्यात आली होती.

मजगांव परीसरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीदत्त मंदिरात यंदा कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या अटि नियम व शर्तीचे पालन करीत सकाळी ६.०० वा.ओम् मल्हारी दत्त देवस्थानचे ट्रस्टी महेश गोस-ावी यांच्या हस्ते श्री मुर्तीची विधिवत पुजा-अर्चा व अभिषेक करण्यात आला.दरवर्षी प्रमाणे होणारी भिक्षेची फेरी यंदाही सकाळी ९.०० वा.अत्यंत साधेपणाने काढण्यात आली होती. सायंकाळी ह.भ.प.श्री. गणेश काळे यांचे श्रीदत्त जन्माचे रहस्य उलगडणारे सुश्राव्य बहारदार किर्तन झाले.याचा परीसरातील भाविकांनी लाभ घेतला.




**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION. AT PANVEL

MISC. PETITION NO.1661 OF 2021

Exh No. : 7/D

Next Date : 19/01/2022

1.Punam Rajesh Kumar Singh, Age : 48
2. Trupti Kumari, Age :24
3 .Ritika Kumari, Age :21
4. Utsav Kumar Singh, Age :15
S.Manya Kumari Singh, Age :15
All residing at Flat No. 16,
Karna CHS,. Road No.-3, Sector-3,
Plot- 20, New Panvel -410206 Petitioner

That 1.Punam Rajesh Kumar Singh, 2. Trupti Kumari, 3.Ritika Kumari, 4. Utsav Kumar Singh, 5.Manya Kumari Singh, are the Legal Heirs of RAJESH KUMAR SINGH ; the deceased above-named who died at Satyam Hospital, Kalamboli Taluka -Panvel, Dist - Raigad , on 12th day of April, 2021 and in the property description is in the name of the disease is attached.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**FLAT NO 16 ADMEASURING AREA ABOUT 74.34 SQ. MTRS.(800SQ.FT)BUILT UP AREA ON FOURTH FLOOR, SITUATED AT KARNA CO-OP HOUSING SOCIETY LTD, PLOT -20, SECTOR-3, NEW PANVEL, DIST-RAIGAD -410206**

You the member of public are hereby given notice to appear in the Court Of Civil Judge Panvel in personal or by pleader duly instructed to file your Say/Objection in any within 30 (thirty)days from the date of publication of this public notice and which is the application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided. Given under the hands and Seal of this court of this 18 th December 2021

Sd/- Clerk Civil Court Senior Division Panvel | Court Seal | Sd/- Assit.Superitent Civil Court Senior Division Panvel


## माथेरानमध्ये निराधार महिलांसाठी मासिक पेन्शन योजना

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान शिवसेना शहरशाखा प्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी आपल्या मातोश्री स्व. मीरा रमेश चौधरी यांच्या स्मृती प्रित्यर्थ माथेरान मधील निराधार जेष्ठ गरजू महिलांसाठी मासिक एक हजार पेन्शन योजना कर्जतचे आमदार श्री महेंद्र थोरवे यांच्या हस्ते आजपासून सुरू केली आहे.

मीरा फाँडेशनच्या माध्यमातून माथेरानमध्ये अनेक चांगले उपक्रम राबवले जातात अनेकांना मासिक लागणारी औषधे दर महिन्याला मोफत दिली जाताय आता माथेरानमधील १४५ महिलांना दर महिन्याला एक हजार रुपये पेन्शन स्वरूपात देण्यात येणार आहेत ह्या उपक्रमाचे कौतुक सर्वच राजकीय पक्ष, व सामाजिक संस्थांनी व्यासपीठावर उपस्थित राहून केले शिवसेनेचे शहरप्रमुखांचा कार्यक्रम असतानाही व्यासपीठावर राष्ट्रवादी, काँग्रेस, भाजपा मनसे, शेकाप व सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते ह्यावेळी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस अजय सावंत, गटनेते प्रसाद सावंत यांनी त्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले तर निवडणुकीमध्ये जेष्ठांना पेन्शन देणार हा दिलेला शब्द पूर्ण केला ह्याबद्दल आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी आपल्या मार्गदर्शन पर भाषणामध्ये शिवसेना माथेरानच्या विकासासाठी कटिबद्ध असून माथेरानच्या विकासासाठी निधी कमी पडून देणार नाही असे जाहीर केले तर आगामी निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी होणार का ह्या पत्रकारांच्या प्रश्नाला बगल देताना शिवसेनेचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणून पुन्हा एकदा शिवसेनेचीच सत्ता आणणार असे जाहीर केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मीरा फाउंडेशनच्या अध्यक्षा रेखा चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## दुचाकी नोंदणीसाठी नविन मालिका सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल कार्यालयामध्ये दुचाकी मोटार वाहनांच्या नवीन नोंदणीसाठी एमएच ४६ सीडी ही नवीन मालिका लवकरच सुरु होत असल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांनी कळविले आहे.

पनवेल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील उरण, पनवेल, कर्जत व खालापूर तालुक्यातील नागरिकांना याद्वारे आव-ाहन करण्यात येते की, ज्यांना आपल्या नवीन वाहनासाठी एमएच ४६ सीडी या मालिकेतील आकर्षक/अनाकर्षक नोंदणी क्रमांक राखीव करावयाचे असतील त्यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत संपर्क साधण्यात यावा.


**ग्रुप ग्रामपंचायत गोंडघर**

मु.पो.गोंडघर, ता.म्हसळा, जि.रायगड

**अल्पमुदतीची निविदा सूचना**

दि. १७/१२/२०२१

ग्रुप ग्रामपंचायत गोंडघर ता.म्हसळा, जि.रायगड हद्दीतील १५ वा वित्त आयोग (ग्रा.पं.स्तर) सन २०२१-२२ अंतर्गत खालील कामे करावयाची आहेत. सदर कामाची प्रशासकीय मान्यता दिलेली असून तांत्रिक मान्यता उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग म्हसळा यांनी दिलेली आहे. तरी सदर काम करण्याकरिता नोंदणीकृत खरेदीदाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | अंतिम तारीख व वेळ | कोरे निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | FHTC अंतर्गत १००% कुटुंबांना नळ जोडणी देणे | २,७७,२००/- | २१/१२/२०२१ सायंकाळी ४ वाजेपर्यंत | २००/- |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

३) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

४) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/- ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत गोंडघर** | **सही/- सरपंच ग्रुप ग्रामपंचायत गोंडघर**



राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
विवेक सदाशिव तावडे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८७९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०२/२०२२

१) विमल नारायण जढर, वय : ५४
२) मेघा नारायण जढर, वय : ३४
३) योगेश नारायण जढर, वय : ३०
४) तृप्ती नारायण जढर, वय : २७
५) दिपाली नारायण जढर, वय : २५
६) प्रतिक नारायण जढर, वय : २१
सर्व रा.सदनिका क्रं.६०१, ६ वा मजला,
तेजस एक्सोटीका को.ऑप.हौसिंग सोसायटी
लिमिटेड, प्लॉट नं.११९, काळुंद्रे नोड,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै. नारायण पेवजी जढर यांचे निधन दि.१८/०४/२०२१ रोजी येथे झाले असून अर्जदार १) विमल नारायण जढर, वय : ५४, २) मेघा नारायण जढर, वय : ३४, ३) योगेश नारायण जढर, वय : ३०, ४) तृप्ती नारायण जढर, वय : २७, ५) दिपाली नारायण जढर, वय : २५, ६) प्रतिक नारायण जढर, वय : २१ सर्व रा.सदनिका क्रं.६०१, ६ वा मजला, तेजस एक्सोटीका को. ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं.११९, काळुंद्रे नोड, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ यांनी कै.नारायण पेवजी जढर यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील सदनिका क्रं.६०१ (क्षेत्र ४१.३७४ चौ.मी.बिल्टअप), ६ वा मजला, तेजस एक्सोटीका को.ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं.११९, काळुंद्रे नोड, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६, अशा वर्णनाची मिळकत**

कै.नारायण पेवजी जढर यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर साो. कोर्ट

ॲड.हर्षदा सुनील गडकर
अर्जदार तर्फे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८०७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३१/०१/२०२२

श्री.कांगरशेरी नारायणन विजयन
रा.फ्लॅट नं.३०६, ३ रा मजला,
जेसल मेलोडी, प्लॉट नं.३०३/२, तक्का, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

१) या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार हे कै.तंगम नारायणन यांचा मुलगा आहे.

२) कै.तंगम नारायणन ह्या दि.०४/०२/२०१५ रोजी मौजे : गांधी हॉस्पिटल पनवेल, महाराष्ट्र येथे मयत झालेले असून कै.तंगम नारायणन यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. तसेच अर्जदारां व्यतिरिक्त कै.तंगम नारायणन यांस आणखीन कोणीही वारसदार नव्हते व नाहीत.

३) कै.तंगम नारायणन यांचा पनवेल शहर महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड येथे खुद्द मालकीचा व नावे असलेला प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाचा फ्लॅट होता व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**अ) फ्लॅट नं.३०६, ३ रा मजला, (कारपेट एरिया ६३६ चौ.फूट (५९.१३ चौ.मीटर) व त्या सोबत असलेला टेरेस-क्षेत्र ७८ चौ.फूट (७.२८ चौ.मीटर), जेसल मेलोडी, प्लॉट नं.३०३/२, तक्का, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**

४) कै.तंगम नारायणन यांची वर कलम ३ मधील नमूद खुद्द मालकीची व नावे असलेली प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकतीतील आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांनी तसा वारस दाखला मिळण्याकरिता दिवाणी चौकशी अर्ज क्र.१८०७/२०२१ पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिकतीबाबत अर्जदार हे कै.तंगम नारायणन यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर राहून लेखी हरकत स्वतः अगर वकीलांमार्फत सादर करावी.

वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे लाभात अर्जदारांच्या नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.१७/१२/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# विचुंबे येथील हत्या प्रकरणातील आरोपींना जन्मठेप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील विचुंबे येथील दोघा बाप लेकाची हत्या केलेल्या आरोपीना न्यायालयाने दोषी धरून आजन्म करावास (जन्मठेप)आणि दोन लाख एक हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. फिर्यादी मिराबाई याना दंडाच्या पुर्ण रक्कमेतून ५० टकके रक्कम आणि उर्वरित ५० टकके रक्कम अस्मिता रूपेश म्हात्रे याना नुकसानभरपाई म्हणून देण्यास न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. या खटल्याच्या निकालाकडे पनवेल परिसरातील लोकांचे लक्ष लागून राहिलेले होते.

२८ डिसेंबर २०१६ रोजी पनवेल मधील विचुंबे येथे आरोपी मंगेश गणपत म्हात्रे (वय - ३२), रविंद्र गणपत म्हात्रे, (वय - ३०), सुनिता गणपत म्हात्रे, (वय ६५ रा. विचुंबे) यांनी संगनमताने जुन्या भांडणाचा राग आणि डिसेंबर २०१६ रोजी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून विचुंबे येथील लक्ष्मण म्हात्रे व रुपेश म्हात्रे याना ठार मारले होते. आरोपी मंगेश म्हात्रे, रविंद्र म्हात्रे आणि सुनिता म्हात्रे यांच्या जागेमध्ये बेबीबाई जाधव यांनी घर बांधले होते. ते बांधलेले घर काढुन टाक अशी वादा-वादी चालु असताना यातील मयत लक्ष्मण लिक-या म्हात्रे, रूपेश लक्ष्मण म्हात्रे हे आरोपींना समजावण्यासाठी गेले असता त्यांच्यात धक्काबुक्की झाली.

या प्रकरणाबाबत मयत यांनी आरोपीविरूध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली असता या गोष्टीचा आरोपींनी मनात राग धरून त्याच दिवशी दुपारी ३ वा. आरोपी हे मयत लक्ष्मण लिक-या म्हात्रे आणि रूपेश लक्ष्मण म्हात्रे यांच्या घरी हातात पारई, सळई आणि चाकु अशी हत्यारे घेवून गेले. आणि पारईने आरोपी मंगेश याने लक्ष्मण यांना ठार केले. आरोपी रविंद्र याने रूपेश यावर चाकुने गंभीर वार केले, त्यात ते मृत्यमुखी पडले. तसेच आरोपी सुनिता हिने फिर्यादी मिराबाई हिला लाठीकाठीने मारून गंभीर दुखापत केली. या गुन्हयाची नोंद खांदेश्वर पोलीस ठाणे येथे करण्यात आली.

सदरच्या खटल्याची सुनावणी अति. सत्र न्यायाधीश - १, राजेश अस्मर सो. यांच्या न्यायालयात झाली. या प्रकरणामध्ये सरकारी पक्षातर्फे विशेष शासकीय अभियोक्ता, अँड. सतिश म्हात्रे यांनी एकुण १६ साक्षीदारांची साक्ष नोंदविली. या केसमध्ये फिर्यादी मिराबाई लक्ष्मण म्हात्रे, साक्षीदार अस्मिता रूपेश म्हात्रे, नितीन लक्ष्मण म्हात्रे, बेबीबाई जाधव, भास्कर भोपी, डॉ. रितीका चव्हाण, डॉ.अवसरमल आणि तपासिक अंमलदार संतोष जाधव, सहा. पो. नि. आणि बालवडकर, आहिरराव यांची साक्ष महत्वाची ठरली.

तपासिक अंमलदार, संतोष जाधव, सहा. पोलीस निरीक्षक, खांदेश्वर पोलीस ठाणे यांचा तपास महत्वाचा ठरला. सरकारी पक्षातर्फे विशेष शासकीय अभियोक्ता, ॲड. सतिश म्हात्रे यांनी न्यायालयासमोर केलेला युक्तिवाद आणि दाखल केलेले न्यायनिर्णय ग्राह्य धरून अति. सत्र न्यायालय १, राजेश अस्मर यांनी १६ डिसेंबर २०२१ रोजी आरोपी मंगेश गणपत म्हात्रे, रविंद्र गणपत म्हात्रे, सुनिता गणपत म्हात्रे यांना दोषी धरून आजन्म करावास (जन्मठेप) आणि दोन लाख एक हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे.

## संक्षिप्त...

### आदिवासीवाडीवर कातकरी उत्थान अभियानाचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

माणगाव तालुक्यामध्ये महाराजस्व अभियानास प्रारंभ झाला असून त्याअंतर्गत दि.१६ डिसेंबर रोजी माणगाव तालुक्यातील एकलव्यनगर (चांदे) आदिवासीवाडी येथे कातकरी उत्थान अभियान माणगाव उपविभागीय अधिकारी प्रशाली दिघावकर व तहसिलदार प्रियंका आयरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आले.

माणगाव तालुक्यामध्ये एकूण ९८ कातकरी वाड्या असून सुमारे २० हजार इतकी आदिवासी लोकसंख्या आहे. या कातकरी वाड्यांमध्ये शासनाच्या सर्व योजनांची यशस्वी अंमलबजावणी करुन आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावणे, स्थलांतर रोखणे, आरोग्य विषयक जनजागृती करणे, व्यसनाधीनता, बालविवाह रोखणे तसेच रोजगार निर्मिती करुन आदिवासी बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे इत्यादी व्यापक उद्देशाने जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कातकरी उत्थान अभियान अधिक गतिमान करण्यासाठी माणगाव तालुक्यातील सर्वच आदिवासी वाड्यांवर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून पालक अधिकारी मार्फत वाडीचे संपूर्ण सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. प्रत्येक आदिवासी वाडीसाठी एक पालक अधिकारी नियुक्त करण्यात आला आला आहे. या अभियानाचा शुभारंभ चांदे एकलव्यनगर (चांदे) आदिवासीवाडीवर झाला असून यावेळी मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते. या शिबिरामध्ये वयाचे दाखले-६९, आधारकार्ड नोंदणी-११, वाहन परवाना-९, जॉबकार्ड-१३, शिधापत्रिकेमध्ये नाव वाढविणे-२६ इत्यादी लाभ देण्यात आले. तसेच यावेळी शासनाच्या विविध योजनांचीही माहिती देण्यात आली व उपजिल्हा रुग्णालय, माणगाव येथील वैद्यकीय अधिकारी श्री.प्रदीप इंगोले व त्यांच्या पथकामार्फत आदिवासी बांधवांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तसेच कोविड-१९ चे १०० टक्के लसीकरण पूर्ण करण्यात आले. याप्रसंगी तालुक्यातील सर्व प्रशासकीय प्रमुख, सर्व विकासदीप संस्थेचे संचालक श्री. रिची भाऊ व समन्वयक श्री. महेश मोरे, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.



# महामार्गावर बैलांची झुंज ; मोकाट गुरांचा प्रश्न ऐरणीवर

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

मुंबई-गोवा महामार्गावर खांब नाक्याजवळील परिसरात रंगलेल्या बैलांच्या झुंजीमुळे पुन्हा एकदा महामार्गावरील मोकाट गुरांच्या समस्येचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

याबाबतचे वृत्त असे की,ता.१७ रोजी खांब नाका येथील साई नगर जवळील परिसरात सायं.५ वा.दोन बैलांची जुपलेली झुंज थांबता थांबत नव्हती.बघता बघता ही झुंज महामार्गावर आल्याने वाहतूकीमध्येही अडथळा निर्माण होऊन काहीकाळ वाहतूकही थांबली होती.

तर या झुंजीमुळे वाहनचालक व प्रवासीवर्गातही भितीदायक वातावरण निर्माण झाले होते. बैलांच्या या झुंजीमुळे पुन्हा एकदा मोकाट गुरांच्या समस्येचा प्रश्न ऐरणीवर आला असून मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याची मागणीही केली जाऊ लागली आहे.अशा या मोकाट गुरांची समस्या सर्वत्र चर्चेचा विषय बनून राहिला आहे. नेहमीच्याच या समस्येमुळे कित्येक ठिकाणी अपघातही घडले आहेत. तर अनेकवेळा वाहतूक कोंडीची समस्याही निर्माण होत असताना दिसत आहे.

खांब नाक्या जवळील साई नगर येथील महामार्गावर दोन मस्तवाल बैलांची झालेली झुंज पाहण्यासाठी बघ्यांचीही मोठी गर्दी झाली होती. कित्येकानी विविध प्रकारे झालेली झुंज सोडविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले परंतु तेही निष्फळ ठरले होते.छोटे वाहनचालक कसेबासे वाहन चालविताना दिसत होते.एकंदरीत बैलांच्या या झुंजीमुळे महामार्गावर पुन्हा एकदा मोकाट गुरांच्या मुक्तपणे फिरण्याची समस्या ऐरणीवर आली आहे.

# पनवेल येथे श्री स्वामी समर्थ मठात दत्तजयंती उत्साहात साजरी

## आरती संग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ब्रम्हा, विष्णू, महेश या तिनही देवतांचे स्वरुप ज्यांच्या ठायी आढळते. आणि त्यामुळेच ज्यांना भाविकांच्या मनात महत्वाचे स्थान आहे. आणि ज्यांच्या प्रती मनामनात अपार श्रध्दा आहे. त्यादत्तगुरुंचीजयंती शनिवारी गावदेवीपाडा पनवेल येथे श्री स्वामी समर्थ मठात नियमांचे पालन करत मोठ्या उत्साहात दत्त जयंती साजरी करण्यात आली.त्याच बरोबर मान्यवरांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ आरती संग्रह आणि स्वामीच्या पोथीचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी श्री स्वामी समर्थ मठाधिपति सुधाकर भाऊ घरत, पालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद ढोले व पोलीस शिपाई धनवट,संवेदना प्रकाशन पुणेचे नितीन हिरवे, पत्रकार संजय कदम, पत्रकार प्रशांत शेडगे आणि असंख्य स्वामी भक्त उपस्थित होते. या वेळी बोलतांना मठाधिपति सुधाकर घरत यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की श्री स्वामी समर्थांच्या इच्छे मुळेच हे पुस्तक प्रकाशित होत असून याच नित्य पठण केल्यास स्वामी समर्थ नक्कीच संकटाच्या वेळेस भक्तांना योग्य मार्ग दाखवतील.



दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन श्री स्वामी समर्थ मठात करण्यात आले होते. यावेळी श्रीपाद वल्लभ दिगंबरा चा जयघोष, मंत्रपठण, आरती, होमहवन, लघुरुद्र, दत्तयाग असे विविध धार्मिक कार्यक्रम यानिमित्ताने झाले. दर्शनासाठी स्वामी समर्थ मठा बरोबरच इतर दत्तमंदिरात भाविकांनी दर्शन घेतले. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम साजरे करण्यात आले. श्री ची काकड आरती, नित्यनैमितिक पूजा प्रसाद, लघूरूद्र, दत्तजन्म सोहळा, श्रीदत्तगायत्री होम हवन, श्रीस्वामी समर्थ महिला मंडळ यांची भजने त्या नंतर श्री ची महा आरती आणि महादेव बुवा शहाबाजकर आणि मंडळी यांची भजने झाली. उत्सवात मोठ्या प्रमाणात स्वामी भक्तांनी सहभाग घेतल्याचे मठाधिपती सुधाकर घरत यांनी सांगितले.

# पोलादपूर नगरपंचायतीत काँग्रेस पक्षच बाजी मारणार : महेंद्र घरत

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शिवसेनेच्या नाकर्तेपणामुळे मतदारांमध्ये प्रचंड रोष दिसून येत असून येत्या मतदानातून हा रोष मतदार व्यक्त करतील, अशी प्रतिक्रिया रायगड जिल्हा काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी प्रस्तुत प्रतिनिधीजवळ बोलताना व्यक्त केली. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी या निवडणुकीमध्ये बाजी मारेल, असा विश्वासही यावेळी जिल्हाअध्यक्ष घरत यांनी व्यक्त केला.

पोलादपूर नगरपंचायत निवडणुकीत मतदानाला काही दिवसच शिल्लक असून शुक्रवारी दुपारनंतर रायगड जिल्हा काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग ९ च्या उमेदवार तेजश्री अभिषेक गरुड आणि प्रभाग ११ चे उमेदवार स्वप्नील सुभाष भुवड यांच्या प्रचारार्थ पोलादपूर येथे आले होते.

रायगड जिल्हा सहप्रभारी श्रीरंग बर्गे, महाडच्या नगराध्यक्षा स्नेहल जगताप, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, जिल्हा सरचिटणीस धनंजय देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्रीधर सकपाळ, जिल्हा सरचिटणीस प्रशांत महामुणकर, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बंडूशेठ देशमुख, पोलादपूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष अजय सलागरे, महाड तालुका अध्यक्ष राजु कोरपे, माजी तालुका अध्यक्ष कृष्णा शिंदे, महाराष्ट्र विद्यार्थी काँग्रेसचे सरचिटणीस



श्रीयश जगताप, मार्तंड नाखवा, पोलादपूर शहर अध्यक्ष अमोल भुवड, युवक अध्यक्ष सचिन दुदुसकर, जिल्हा युवक सरचिटणीस मुन्ना शिंदे, जिल्हा युवक उपाध्यक्ष मयूर चांदोरकर, विधानसभा युवक अध्यक्ष ॲड. सचिन गायकवाड, विधानसभा विद्यार्थी अध्यक्ष अनिकेत येरूणकर, तालुका विद्यार्थी अध्यक्ष प्रसाद देशमुख सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी, पोलादपूर नगरपंचायतीच्या निवडणुकप्रचारामध्ये महाड विधानसभा काँग्रेसचे नेते हनुमंत जगताप यांच्या नेतृत्वाखाली तरुण कार्यकर्त्यांचा व युवतींचा उत्साह आणि जेष्ठ मंडळींचा सहभाग पाहता या नगरपंचायतीवर पक्षाचा झेंडा फडकल्याशिवाय रा-हणार नाही, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी प्रभाग १ मीनल जगताप, प्रभाग ३ निखिल कापडेकर, प्रभाग ४ अर्चना शिंदे, प्रभाग ५ अपर्णा कदम, प्रभाग ६ समिधा महाडीक, प्रभाग ७ आशा गायकवाड, प्रभाग ९ तेजश्री गरूड, प्रभाग ११ स्वप्नील भुवड, प्रभाग १२ श्रावणी शहा, आणि प्रभाग १७ दिलीप भागवत आदी उमेदवार उपस्थित रॅलीमध्ये सहभागी झाले.

# माथेरानच्या पंचशील नगरचे रुपडे पालटतेय

**दै.रायगड नगरी । माथेरान**

गावाचा विकास होत असताना अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित राहिलेले पंचशील नगर विकासात्मक दृष्टीने नव्या उगमाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. अनेकदा या ठिकाणी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत आलेल्या निधीचा उपयोग करून घेतला गेला नाही त्यामुळे हा भाग खूपच मागासलेल्या अवस्थेत होता. परंतु या पाच वर्षांच्या काळात गावातील विकास कामे मार्गी लागत असताना या भागाला सुध्दा विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सत्ताधारी गटाने प्रयत्न केले आहेत.



पंचशील नगरच्या पूर्वेकडील भागात मोठया प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरलेले होते. त्या भागाचा एकप्रकारे उकिरडा बनला होता. सर्व घरातील सांडपाणी वाहून नेण्यासाठी सुयोग्यप्रकारे गटारे बांधण्यात आलेली नसल्याने त्या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या झोपडपट्टी जवळून दुर्गंधी युक्त सांडपाणी वाहून जात असल्याने येथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता. याकामी सत्ताधारी गटाने विरोधी पक्षाला विश्वासात घेऊन या ठिकाणी सुयोग्य नियोजन करून झोपडपट्टी भागाच्या अगदी शेवटच्या टोकापर्यंत सांडपाणी वाहून नेण्यासाठी जांभ्या दगडात अद्ययावत गटारे बांधण्याची कामे अंतिम टप्प्यात असून या भागाच्या प्रवेशद्वारापासून उत्तम प्रकारे गटारांचे बांधकाम पूर्ण केलेली आहेत.विविध कार्यक्रमांसाठी स्टेजचे सुशोभीकरण केले आहे तर आबालवृद्ध मंडळींना बसण्यासाठी मधोमध छोटेसे पटांगण क्ले पेव्हर ब्लॉक मध्ये करण्यात आले आहे. आवश्यक भागात संरक्षण भिंती उभारल्या आहेत त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# महाराष्ट्र भुषण कै. नानासाहेब धर्माधिकारी यांचे शिल्प बल्लाळेश्वर तलाव परिसरात उभारावे : मनसे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र भुषण कै. नानासाहेब धर्माधिकारी यांच शिल्प बल्लाळेश्वर तलाव परिसरात उभारावे अशी मागणी पनवेल मनसेने पालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. यावेली पराग बालड, शहराध्यक्ष, नविन पनवेल, संजय मुर्कुटे, शहराध्यक्ष, पनवेल उपस्थित होते.

सध्या शहरातील प्रसिद्ध बल्लाळेश्वर तळयाच्या सुशोभिकरणाचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. पनवेल शहरातील पुरातन आणि ऐतिहासिक महत्त्व असलेल्या या तळयाकडे मध्यंतरी प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झाले होते. तलावातील गाळ काढण्याच्या ना-वाने निवीदा निघाल्या. त्यानंतर या तळयाची, या शहराची ख-या अर्थाने निस्वार्थी भावनेने जर कोणी सेवा केली असेल तर ती महाराष्ट्र भूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या सारख्या व्यक्तीमत्वाच्या सानिध्यात तयार झालेल्या श्री सदस्यांनी. याबद्दल खरतर या शहराने कै.नानासाहेब धर्माधिकारी यांचे सदैव ऋणी रहायला हवे.असे मनसेने निवेदनात म्हटले आहे. सन २०१५-१६ मध्ये बल्लाळेश्वर तळयातील गाळ काढण्याची वेळ आली तेव्हा कै.नानासाहेबांच्या श्री सदस्यांनी सतत १५ दिवस अविश्रांत मेहनत करून या तळयातील गाळ विनामोबदला काढून नगरपालिकेचे लाखो रूपये वाचवले होते. पनवेल शहरात आजही असंख्य श्री सदस्य कै. नानासाहेबांच्या शिकवणुकीनुसार शहर संकटात असताना रस्त्यावर उतरून लोकांना मदत करतात. रायगड जेव्हा जेव्हा संकटात सापडलाय तेव्हा तेव्हा महाराष्ट्र भुषण कै. नानासाहेब धर्माधिकारींच्या श्री सदस्यांनी रायगडवर आलेल्या संकटांशी दोन हात केले आहेत. या सर्वाची जाण ठेवुन पनवेल महानगरपालिकेकडे महाराष्ट्र भुषण कै. नानासाहेब धर्माधिकारी यांचे शिल्प बल्लाळेश्वर तलाव परिसरात उभारावे अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली आहे.

# रानमाळावर पेटले वणवे, वन अधिकारी झोपले

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यातील जंगलभाग, रान माळ, डोंगर पठारावर दैनंदिन वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. हाळ खुर्द डोंगर परिसरात आज सकाळी ११.०० वाजेच्या सुमारास वणवा लागला होता. ऐवढा मोठा वणवा लागला असताना वन विभागातील अधिकारी याबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून आले.



खालापूर तालुक्यात डोंगरावर अनेक ठिकाणी जाणूनबुजून आगी लावल्या जातात? परंतु याबाबत वन विभागातील अधिकारी कारवाई करताना दिसून येत नाहीत. या वणव्याच्या अग्नि ज्वाळांनी वनसंपदा नष्ट होताना दिसत आहे. येथील हाळ खुर्द डोंगर परिसरात लागलेल्या वणव्याने हाळ ग्रामस्थांची चांगलीच तारांबळ उडाली आहे.

# म्हसळा तालुक्यात दत्त जयंतीचा गजर उत्साहात आणि आनंदात संपन्न



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गेली दोन वर्षे कोरोनाच्या महामारीमुळे शांत पणे आणी साधेपणाने दत्त जयंती उत्सव साजरा केला गेला. या वर्षी मात्र कोरोनाची भीती थोडीफार दूर झाल्याने तालुक्यात दत्त जयंती उत्साह आणी फार मोठया प्रमाणात पाहवयास मिळाला.१९७२ साली वारळ च्या नदीकाठी गावातील अज्ञान मुलांना साकार रूपाने दर्शन देऊनमूर्ती रूपाने नदिकाठाच्या गुहेत दत्तगुरु स्थानापन्न झाले.

या वर्षीच्या उत्सवनिमित्त अभिषेक, दिंडी यात्रा, कब्बडी सामने, सत्यनारायण महापूजा, अश्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नरेश भाई चाळके, आणी मधुकर हरीचंद्र नात्की यांच्या माध्यमातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी खास. सुनिल तटकरे, पालक मंत्री आदिती तटकरे, आम. अनिकेत तटकरे,मुंबई मंडळ अध्यक्ष रुपेश पाटील, स्थानिक अध्यक्ष धोंडू पाटील, लहू ताम्हाणकर, जनार्दन चाळके, मुंबई मंडळ आणी स्थानिक मंडळ पदाधिकारी, महिला मंडळ, ग्रामस्थ मोठया प्रमाणात उपस्थित होते. वारळ सह तालुक्यातील देवघर लखमेश्वर येथील श्री दत्त गुरु ,खारगाव बुद्रुक येथील श्री दत्त गुरु महाराज,तोंडसुरे येथील श्री दत्त गुरु आणि तालुक्यातील सर्व गावागावातून नियमांचे पालन करून दत्तजयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.